नवराष्ट्र
www.navarashtra.com

## राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रीयस्तरावर गौरवान्वित

# डॉ. विकास ढोमणे यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार



**शैक्षणिक**

**भंडारा,** ब्युरो. जे. एम. पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास ढोमणे यांना राष्ट्रीयस्तरावरील उत्कृष्ट प्राचार्य म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल पी. सी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरवान्वित करण्यात आले. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड् 2025' या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून राज्यपाल पी. सी. राधाकृष्णन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवार, महाराष्ट्र सायबरचे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे, क्वीक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, क्वीक हील टेक्नॉलॉजी लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर, महा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल माळवी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. 'सायबर स्मार्ट क्लब' उपविजेता पुरस्कार जे. एम. पटेल कॉलेजला प्रदान करण्यात आला. हे सर्व पुरस्कार प्राचार्य डॉ विकास ढोमणे यांच्या तर्फे संगणक विभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रविण घोसेकर यांनी स्वीकारले. राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट सेक्रेटरी उपविजेता पुरस्कार बी. एस. सी. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी श्रुती चावके हिला प्रदान करण्यात आला. या तीन राष्ट्रीय पुरस्कारासोबतच 12 विद्यार्थ्यांना विविध श्रेणीतील 6 पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये बेस्ट प्रोसेस कंप्लायन्स पुरस्कार रागिणी बाभरे आणि मंथन पशिने यांना तर उपविजेते म्हणून खुशी आकरे व प्रचिका सोमनाथे यांना देण्यात आला. हायेस्ट ऑफलाईन आऊटरिच पुरस्कार मानसी शेंडे व पूर्वा लांजेवार यांना तर उपविजेते म्हणून साक्षी खंगार व साक्षी येवले यांना प्रदान करण्यात आला. हायेस्ट ऑनलाइन आऊटरिच पुरस्कार सलोनी ठकरेला व मिष्टी दास यांना तर उपविजेते म्हणून पूजा गिरीपुंजे व श्रुती वैद्य यांना प्रदान केला. संगणक विभाग प्रमुख डॉ. प्रविण घोसेकर, प्रा. डॉ. सबाह नसीम, पलाश फेडुवार, फरिना शेख डॉ. कार्तिक पनीकर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

Bhandara Plus Edition
Jan 17, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com